Vol 5 Issue 5 Nov 2015
ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063


Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.D Research Scholar Faculty of Education IASE, Osmania University , Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

**Golden Research Thoughts** | **Impact Factor : 3.4052(UIF)**
**ISSN 2231-5063** | **Volume - 5 | Issue - 5 | Nov - 2015**

# "भारत–अफगाणिस्तान संबंधांच्या वाटचालीचे अवलोकन"

*सविता शिवनाथ झुंजारे*
*संशोधिका, राज्यशास्त्र विभाग, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.*



सविता शिवनाथ झुंजारे

***प्रस्तावना :***

भारत-अफगाणिस्तान संबंधांचा इतिहास हा आधुनिक नसून कित्येक वर्षापासूनचा साक्ष देतो की, अफगाणिस्तानांतर्गत शांतता निर्माण करण्यासाठी तेथील जनतेस अनेक युध्दाचा सामना करावा लागला. त्याच प्रकारची आंदोलने स्वातंत्र्यासाठी भारतीय जनतेस करावे लागले. दोन्ही राष्ट्रांना पारतंत्र्याचे दुःख, सारख्या प्रमाणात सहन करावे लागले. स्वातंत्र्यापूर्वी दोन्ही राष्ट्रांच्या सीमा लगत असल्यामुळे जेंव्हा परकीय अफगाणिस्तानमध्ये आले. तेंव्हा त्यांनी भारतावरही आक्रमण करण्याचे धाडस दाखविले. दोन्ही देशाच्या भौगोलिक वातावरणात, संस्कृती क्षेत्रात आणि राहणीमानात काही अंशी प्रमाणात सारखेपणा दिसून येतो. बौध्द धर्माचा प्रसार जसा भारतात झाला तशाच प्रकारचा प्रसार अफगाणिस्तानमध्ये अशोक सम्राटच्या कालखंडात झाला. त्यामुळे सांस्कृतिक संबंधाचा इतिहास समान दिसतो. आज दोन्ही देशात मुस्लिम धर्म असून भारतातील मुस्लिमांना अफगाणिस्तानातील मुस्लिमांपेक्षा अधिकाधिक प्रतिष्ठेची वागणूक दिली जाते. त्यामुळे अफगाणिस्तानमधील जनता भारताला सलाम करुन लोकशाही विचाराचे समर्थक मानतात.



दोन्ही राष्ट्रांचे मैत्री-संबंध पारतंत्र्या पासूनच दिसून येतात. प्रथम अफगाणिस्तान हा देश १९१९ साली स्वतंत्र झाला तरी भारताच्या बाबतीत तो सदैव मित्र म्हणून सहकार्य केल्याची साक्ष देतो. महाभारतामधील राजमाता गांधारीपासूनचा प्राचीन इतिहास हा भारत-अफगाणिस्तान संबंधाचे पुरावे देतो. भारतीय संस्कृतीचा प्रभाव अन्य राष्ट्रांच्या संस्कृतीपेक्षा अफगाणिस्तानच्या संस्कृतीवर अधिक दिसून येतो. बामियानातील बुध्दांच्या उंच मुर्त्या, कनिष्क राज्याचे शिक्के, काबूलमधील बाबरची समाधी, आसामाईचे मंदिर हे दोन्ही देशाचे मैत्री-संबंध आजही दर्शवितात. अर्थात स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत दोन्ही देश मैत्री जपण्याचा तसेच आलेल्या संकटाचा सामना समान धोरणाद्वारे एकजूटीने करण्यासाठी एकमेकांना सहकार्य करीत आलेले आहेत.

भारताने आपल्या विकासाकरीता शेजारील राष्ट्रांत शांतता असणे आवश्यक आहे. हा उद्देश ठेवून अफगाणिस्तानला सर्वाधिक सहकार्य करीत आला आहे. भारताच्या सहकार्यामुळेच अफगाणिस्तानात २००२ साली लोकशाही विचाराचे हमीद करझाई सरकार स्थापन झाले. यापूर्वी 'सार्क' मध्ये अफगाणिस्तानला सदस्य मिळावे म्हणून भारताचे पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी सदस्यत्व देण्याबाबतचा विचार मांडला. त्यामुळे ”गुजराल सिध्दांताला“ अखेर यश मिळाले (१-इंद्रकुमार गुजराल, दिनमान, १९८४, पान ३८). म्हणजेच मनमोहन सिंग सरकारने २००५ साली अफगाणिस्तानला 'सार्क' ८ वा सदस्य राष्ट्र म्हणून मान्यता मिळवून देवून मैत्रीची जपवणूक केली आणि कौटिल्याच्या मंडल सिध्दांताचा वापर करुन डॉ. मनमोहनसिंगानी एका नव्या मैत्रीच्या पर्वाच्या मार्गाचा अवलंब करुन आशियात शांतता, सहकार्य आणि विकासाची नवी दिशा 'सार्क' च्या व्यासपीठाच्या माध्यमातून निर्माण केली.

***ऐतिहासिक पार्श्वभूमी :–***

भारत-अफगाणिस्तान संबंधांचा इतिहास हा ऋग्वेदिक कालखंडापासूनचा दिसून येतो. भारतातून अफगाणिस्तानमध्ये नद्या वाहत होत्या, त्यात सरस्वती नदी महत्त्वपूर्ण आहे. ऋग्वेदात ही नदी वाहत होती, ऋग्वेदातील अफगाणिस्तानचा

अधिकांश प्रदेश सन १००० पर्यंत भारताचा एक अंग मानला जात होता, असे इतिहासकार 'विल्सन' म्हणतात. त्यानंतर शाही राजवंश इराणमधून आला, तेंव्हा या ठिकाणी हिंदू-मुस्लिम राहत होते. शाही राजवंशाने प्राचीन अफगाणिस्तानचे नाव बदलून काफिरास्तान ठेवले. त्या काळात हिंदू लोक तेथे राहत होते. त्यांना आर्य म्हणून ओळखले जात होते. शाही राजवंशाने तेथील हिंदूचे धर्मांतर करुन मुस्लिम बनविले. तो आर्यांचा प्रदेश म्हणून ओळखला जात होता. तो प्रदेश नंतर मुस्लिम बनला, जवळपास त्या ठिकाणी दहा युध्दे झाली. त्यानंतर प्राचीन भारतातील आर्य अधिकाधिक संख्याने पंजाब, सिंध प्रदेश येथे येवून राहू लागली. ही संख्या मध्य आणि वैदिक कालखंडात दिसून येते. पुढे भारतातील आर्य आणि अफगाणिस्तानमधील आर्यातील मुख्य विचारसरणीत बदल झाला. हळूहळू भारत आणि अफगाणिस्तानमधील संबंधात फरक पडला.

अनेक वर्षांपासून दोन्ही देशांना स्वातंत्र्यासाठी संघर्ष करावा लागला. दोन्ही देशांना सारख्याच प्रमाणात संकटांचा समाना करावा लागला. त्यामुळे दोन्ही देशांच्या विचारात समानता दिसून येते, ती म्हणजे शांततापूर्ण सहकार्यातून विकास, तटस्थ राहणे, धार्मिक समानता, सांस्कृतिक एकात्मता आणि उत्पादन, कृषि क्षेत्रातील समानता, उदा. गहू, कापूस, ऊस, एरंड, अंगूर इत्यादी पिके दोन्ही देशात सारख्याच प्रमाणात प्रसिध्द आहेत. विकसित राष्ट्रांबरोबर दोन्ही देशांची आयात-निर्यात सारख्याच प्रमाणात आहे (अमेरिका, ब्रिटन, सोव्हिएट संघ). त्याचबरोबर दोन्ही देशातील नागरिकांची उंची सारख्याच प्रमाणात दिसते. तसेच सुंदर स्त्रिया या दोन्ही देशांचा अलंकार दिसतात. दोन्ही देशांना सारख्याच प्रमाणात दहशतवाद सतावत आहे. त्यामुळे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक संबंध सारख्याच प्रमाणात दिसून येतात. दोन्ही राष्ट्रांनी विकासाआड येणाऱ्या संकटाचा सामना सामूहिकपणे करण्यावर भर दिला आहे. त्यात भारताने अधिक पुढाकार घेतलेला आहे.

सकारात्मक संबंध टिकवून ठेवण्याचे काम राजकीय संबंधावर अवलंबून असतात. त्याचप्रमाणे दोन्ही देशाचा राजकीय संबंधाचा इतिहास अगदी प्रारंभिक अवस्थेपासून मैत्रीपूर्ण सहकार्याचे दिसून येते. ग्रिक, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, कुशान, हून, सम्राट, कुरु, दारयप, सिकंदर, सेल्युकस, चंद्रगुप्त, मुहमदाने सातव्या शतकात विशाल साम्राज्य स्थापित केले. पाच ते दहाव्या शतकापर्यंत अफगाणिस्तानवर हिंदू राजाचे वर्चस्व होते. त्यानंतर महंमद गझनी, अल्लाउद्दिन, चगेंझखानचे वर्चस्व, हुमायूनच्या साम्राज्यानंतर पूर्णतः मुस्लिम संस्कृतीचा प्रसार केला. अमानुल्ला यांच्या (१६२१) च्या शासन काळात भिन्नता दिसून येते. याच्या काळात ड्युरांड रेषा भारत - अफगाण रेषा होती, ती १६४५ मये स्वतंत्र भारताच्या काळात हीच रेषा अफगाण - पाकिस्तानची सीमा रेषा निश्चित करण्यात आली. त्यामुळे भारत - अफगाणिस्तानमधील सांस्कृतिक समानता थोड्या प्रमाणात कमी झाली. पुढील काळात अफगाणिस्तानमध्ये राजकीय उलथा-पालथ होवून नवनवीन समिकरणे उदयास येवू लागली. तरीही अफगाणिस्तान, भारत आणि रशियाच्या प्रभावापासून अलग राहू शकला नाही (२-डॉ. जे. श्याम सुंदरम, विश्व राजनिति में भारत, पान ४०). अमानुल्ला यांच्या शासन काळामध्ये भारत - अफगाणिस्तान यांच्या मैत्री संबंधांच्या आधुनिक पर्वास प्रारंभ झाला. भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनाला अमानुल्ला यांनी स्पष्ट पाठींबा दर्शवून ब्रिटिश सरकारला पत्र लिहून असे कळविले की, "ब्रिटिश सरकार सोबत अफगाणिस्तानचे संबंध तेंव्हाच प्रस्थापित होतील. जेंव्हा रौलेट ॲक्ट वापस घेवून भारताचे स्वातंत्र्य घोषित होईल, तेंव्हाच ब्रिटन-अफगाण संबंध सहकार्याचे व मैत्रीचे राहील" (३-दिनानाथ वर्मा, आधुनिक भारत, पान १६७). यावरुन दोन्ही देशाचे राजकीय संबंध अधिक दृढ होते असे दिसून येतात. १६४७ च्या अगोदर अफगाणिस्तानची भौगोलिक सीमा भारताशी मिळती होती. दोन्ही देशाच्या संस्कृतीचा इतिहास समान असल्यामुळे सहज दोन्ही देशात संपर्क होत असे. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताने काही सिध्दान्त निर्माण केले ज्यामध्ये वसाहतवाद, साम्राज्यवादास विरोध, हस्तक्षेप थांबविणे, जागतिक शांततेसाठी प्रयत्न करणे, शेजारील राष्ट्रांसमोर संकटे उभे न करणे यावर अधिक भर दिला. भारताच्या या विचाराचा अफगाणिस्तानने पूर्णपणे स्वीकार करुन मैत्रीत अधिक भर दिला आणि पुढे चालून अलिप्त चळवळीचा प्रथम सदस्य देश बनून खरा भारताचा मित्र बनला (४-वाई वोल्कोव, अफगाणिस्तान सच्चाई क्या है, पान ३८). अर्थात भारत - अफगाणिस्तान संबंध निर्माण होण्याचे प्रमुख कारण अलिप्त चळवळीचा स्वीकार करुन त्याचे उद्दिष्ट व तत्त्वाचे पालन करीत आला आहे.

### *भारत – अफगाणिस्तान संबंध राजकीय संबंध :–*

भारत-अफगाणिस्तान संबंधाचा राजकीय इतिहास ऋग्वेदा पासून दिसून येतो. त्याचे कारण दोन्ही देशाच्या भौगोलिक सीमा संस्कृती एकसमान असल्यामुळे त्याचे संबंध मैत्रीचे दिसतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अलिप्त चळवळीचे प्रणेते भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलल नेहरु यांनी स्वीकारलेल्या शांततावादी, पंचशील, तटस्थता, अहस्तक्षेप, सहकार्याची वृत्ती या विचारसरणीचा स्वीकार दुसऱ्या महायुध्दानंतर स्वतंत्र झालेल्या आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका खंडातील अनेक विकसनशील राष्ट्रे करु लागले. अशा स्थितीत सर्व प्रथम नेहरुच्या विचाराचा स्वीकार करण्यास अफगाणिस्तान अलिप्त न राहता सर्व प्रथम स्वीकारुन युगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड या ठिकाणी भरलेल्या पहिल्या अलिप्त चळवळीच्या शिखर परिषदेस सहभागी झाला. नेहरुच्या निधनानंतर लाल बहाद्दूर शास्त्री यांच्या व्यवहारवादी सिध्दांताचे अफगाणिस्तान सरकारने समर्थन करुन मैत्री संबंधातील वाहणारे वारे तेजोमय केले. मैत्री आणि सहकार्य यातूनच शांतता निर्माण करणे काळाची गरज आहे. हा विचार करुन ताश्कंद येथे शांतता करार करीत असताना शास्त्रीजींचे निधन झाले. त्यानंतर भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून श्रीमती इंदिरा गांधीने सूत्रे हाती घेतले आणि म्हणाले जोपर्यंत शेजारील राष्ट्रांमध्ये स्थिरता, शांतता दिसत नाही, तोपर्यंत भारताचा विकास अशक्य आहे असे उदगार काढत असत. श्रीमती इंदिरा गांधी अफगाणिस्तानमधील सोव्हिएत रशियाने केलेल्या सैनिकी हस्तक्षेपास सतत विरोध करुन अफगाणिस्तानच्या बाजूने भारत असल्याचे संकेत देत असत.

अर्थात इंदिरा गांधीच्या कालखंडात भारत-अफगाणिस्तान राजकीय संबंध समतोल दिसतात. त्यानंतर राजीव गांधी यांनी आईच्या निधनानंतर देशाची सूत्रे हाती घेवून विकास, सहकार्य, शांतता, परस्पर मैत्री यावर अधिक भर दिला. परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत आदर्शवाद, व्यावहारवाद, समतोलवादाचे समन्वय साधून देशाला विकासाच्या उंबरठ्यावर आणण्याचा सातत्याने प्रयत्न

केलेला दिसतो. अफगाणिस्तानच्या बाबतीमध्ये श्री. राजीव गांधी यांनी सातत्याने रशियन हस्तक्षेपास विरोध करुन अस्थिर अफगाणिस्तानला स्थिर बनविण्यासाठी प्रयत्न करीत होते. त्यांच्या प्रयत्नास अखेर यश येवून सोव्हिएत सैनिक अफगाणिस्तानमधून मायदेशी परत गेले. यामुळे भारत-अफगाणिस्तान राजकीय संबंधाचा इतिहास मैत्रीपूर्ण दिसतो. पुढे इंद्रकुमार गुजराल या पंतप्रधानाने आपल्या शेजारील राष्ट्रांबाबत महत्त्वाचे विचार मांडताना मैत्रीपूर्ण सहकार्याचा विचार मांडला. तो विचार "गुजराल सिध्दांत" म्हणून प्रसिध्द झाला. त्या सिध्दांतामुळे अफगाणिस्तान या राष्ट्रास भारताने 'सार्क' चा सदस्य होण्याची विनंती केली. त्या विनंतीला मान देवून २००५ साली 'सार्क' चा आठवा सदस्य राष्ट्र अफगाणिस्तान बनला. या सर्व महत्त्वाच्या घडामोडीचे श्रेय अफगाणिस्तानचे राष्ट्राध्यक्ष हमीद करझाई आणि भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांना दिले जाते.



'सार्क' सदस्यत्वासाठी डॉ. मनमोहनसिंगांनी कौटिल्याच्या मंडल सिध्दांताचा वापर करुन 'सार्क' चा आढावा सदस्य राष्ट्र म्हणून अफगाणिस्तानला बहाल करुन भारत- अफगाणिस्तान मैत्रीत अधिकच भर टाकली. आज नरेंद्र मोदी यांनी चौदावी लोकसभा निवडणुक जिंकून पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेत असताना आपल्या शेजारील राष्ट्र प्रमुखांना आमंत्रित करुन शेजारील राष्ट्रांसोबत आपले राजकीय हितसंबंध शपथविधी सोहळ्यापासूनच मजबूत करण्यावर भर दिलेला दिसून येतो. श्री. नरेंद्र मोदींच्या विचारानुसार भारताला विकासाच्या प्रगतीचे मार्ग खुले करण्यासाठी शेजारील राष्ट्राशी मैत्री असणे आवश्यक आहे. जर असे नाही झाले तर भारताचा विकास होणे शक्य नाही. संघर्षातून विनाश निश्चित आहे. परंतु परस्पर सहकार्यातून विकास असतो. हेच ध्येय भारताने स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंत कायम ठेवले. या भारताच्या धोरणास अफगाणिस्तानने सातत्याने पाठींबा व सहमती दर्शवित आला आहे. थोडक्यात विरोधाचा कमी, सहकार्याचा कालखंड अधिक दिसून येतो.

### *भारत – अफगाणिस्तान आर्थिक संबंध :–*

कोणत्याही राष्ट्राचा विकास अर्थव्यवस्थेवर अवलंबून असतो. त्यासाठी राजकीय संबंध इतर राष्ट्रांबरोबर ठेवणे महत्त्वाचे असते. प्रत्येक राष्ट्र आपल्या राजकीय परदेश दौऱ्यातून आर्थिक विकासा करीता अनेक तह, करार करीत असतात. त्यासाठी राष्ट्राचे राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान विदेश दौरे करुन आपले इतर राष्ट्रांशी संबंध निर्माण करुन आर्थिक सहकार्याची मदत घेतात किंवा विविध स्वरुपाचे विकासरुपी करार करतात. असे करार करण्यात भारत आणि अफगाणिस्तान शांत न राहता एकमेकांच्या राष्ट्रांचे परदेश दौरे करुन संबंध निर्माण केल्याचे दिसते. १९६५ पासून भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील आर्थिक संबंधात वाढ झालेली दिसून येते. १९६६ मध्ये भारताने अफगाणिस्तानला ६०,०००/- रुपये देण्याची घोषणा केली. भारताचे उपराष्ट्रपती डॉ. झाकीर हुसैन यांनी काबुलमध्ये भारताकडून १०० कॉट बसणारा एक दवाखाना उभारला. त्यामुळे या दवाखान्याचा उपयोग आजही मोठ्या प्रमाणात होतो आहे. दवाखाना उभारण्यासाठी एक करोड रुपये भारताकडून खर्च करण्यात आला. या दवाखान्यात भारतीय डॉक्टर आणि कर्मचारी कार्य करीत आहेत. १९६९ मध्ये जहीर शाह आणि श्रीमती इंदिरा गांधी यांच्यात आर्थिक आणि व्यापारी करार झाला (५-आतरचंद, इंडिया एण्ड अफगाणिस्तान सैंच्युरी, पान ०१).

त्यानुसार आर्थिक आयोग निर्माण करुन अफगाणिस्तानमध्ये कृषी, शिक्षण, प्रशासन, दवाखाना इत्यादी क्षेत्रामध्ये भारतीय विशेषज्ञांची भरती झाली. श्री. राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या कालखंडात दोन्ही देशाचे राजकीय संबंध मजबूत होते. कारण भारत-पाक रेल्वे रस्ता जोडल्यामुळे अफगाणिस्तानला दैनंदिन वस्तू पाठविण्यासाठी भारत सहज निर्यात करीत असतो. तरीही अलिकडे भारताने रेल्वेच्या वापरापेक्षा वस्तू पाठविण्यासाठी विमानाचा वापर अधिक करताना दिसतो. जसा भारत अफगाणिस्तानमध्ये वस्तू पाठवित असतो, तशा प्रकारचे काही फळे म्हणजे सुका मेवा सारख्या वस्तू अफगाणिस्तान सहज भारतात पाठवित असतो. त्यामुळे दोन्ही देशाचा व्यापार व आर्थिक क्षेत्राचा विस्तार वाढला आहे. दोन्ही देश अलिप्त चळवळीतील सदस्य

राष्ट्रांबरोबर आर्थिक विकास वाढविण्यासाठी आर्थिक व व्यापार यावर भर देत आहे. भारत–अफगाणिस्तानमध्ये शिक्षण आणि सांस्कृतिक विकासात वाढ झाली आहे. काबूल विद्यापीठामध्ये "इन्डोलॉजी" विभागाची निर्मिती केली आहे. भारतातील नृत्य आणि गायनाची जशी प्रशंसा केली जाते. तशाच प्रकारचे भारतीय चित्रपटे, चित्रपटातील गीते अफगाणिस्तानमध्ये लोकप्रिय बनली आहे. बामियानमधील गौतम बुध्दाच्या भव्य मूर्त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी भारताच्या पुरातत्व विभागाने घेतलेली आहे. १९७० नंतर भारत–अफगाण मैत्रीत वाढ झाली आहे, असे जहीर शहा म्हणतात (६–डॉ. एन. के. श्रीवास्तव, भारत और विश्व राजनिती, पान १९६).

१९८१–८५ या कालखंडात दक्षिण आशिया क्षेत्रात महत्त्वाच्या घडामोडी झाल्यामुळे त्याचा सकारात्मक परिणाम भारत–अफगाण संबंधात होवून आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासात वाढ झाली. एकंदरीत औद्योगिक उत्पादनात १/४ अंश वाढ झाली. ही वाढ स्वातंत्र्यानंतरच्या तुलनेत अधिक दिसते. लाईट, गॅस, सिमेंट, नायट्रोजन या उत्पादनात महत्त्वाची वाढ झाली. कृषि क्षेत्रात प्रगती होत आहे. आरोग्य सेवा, शिक्षणात आमूलाग्र बदल झालेला दिसतो. शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी संख्यात वाढ, शाळा महाविद्यालयाच्या संख्येत वाढ झाल्यामुळे शिक्षणाचे प्रमाण अधिक वाढले. त्यासाठी भारताने आर्थिक सहकार्य करुन मोलाची कामगिरी बजावल्यामुळे अफगाणिस्तानने भारतास ज्येष्ठ बंधू म्हणून संबोधला आहे.

२००५ नंतर भारत–अफगाणिस्तान आर्थिक संबंधांत अधिक भर घातली. भारताने सहकार्याची भूमिका निभावून २००० पूर्वी अफगाणिस्तानमधील तालिबानी असलेली राजवट उध्दवस्त करुन २००१ नंतर अफगाणिस्तानच्या पुर्नविकासाकरीता भारतीय पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग सरकारने अनेक प्रकारची मदत करुन तालिबान्याने उध्दवस्त केलेल्या अफगाणिस्तानला स्थिर, पुर्नविकसित करण्यासाठी मोलाची भर घातली. अर्थात तेथील शाळा, महाविद्यालये, दवाखाने उभारण्याकरीता भारतीय विमानाने फर्निचरसहीत मदत केली (७–प्रदिपसिंह राव, अफगाणिस्तान समस्या, भारतीय विदेश निति के संदर्भ में, पान २८). अफगाणिस्तानमध्ये स्थिरता आणि लोकशाही निर्मितीसाठी हमीद करझाई सरकारला प्रथम मदतीचा हात देवून आपले आर्थिक संबंध भारताने अधिकच मजबूत बनविले. सहकार्याशिवाय विकास होणार नाही हे भारत सरकारने ओळखले आहे. म्हणूनच आज नरेंद्र मोदी सरकारने सुध्दा डॉ. मनमोहनसिंगाच्या फॉर्म्यूल्याचा वापर सार्कच्या व्यासपीठावरुन केलेला आहे.

### *परराष्ट्र धोरणातील समानता :–*

भारत – अफगाणिस्तानचे परराष्ट्र धोरण कांही अंशी प्रमाणात समान स्वरुपाचे दिसतात. दोन्ही राष्ट्रांवर स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिशांचे वर्चस्व होते. दोन्ही राष्ट्रांना वसाहतवाद, साम्राज्यवादाचा सामना करावा लागला. स्वातंत्र्यासाठी दोन्ही राष्ट्रांना अनेक वर्ष युध्द, आंदोलने करावे लागले. दोन्ही राष्ट्रांची आर्थिक स्थिती नाजूक होती. स्वातंत्र्यापूर्वी अफगाणिस्तान हा भारताचाच एक भाग होता, त्यावर भारतीय राजाचे वर्चस्व होते. तसेच दोन्ही राष्ट्रांना सारख्याच प्रमाणात समस्यांना तोंड द्यावे लागत असल्यामुळे परराष्ट्र धोरण, अलिप्ततेचा स्वीकार, मैत्रीपूर्ण सहकार्याचे तत्त्वे स्वीकारुन हस्तक्षेप साम्राज्यवाद, वसाहतवाद सारख्या समस्यांचा प्रखर विरोध दोन्ही राष्ट्रे करीत होते. त्याचबरोबर लोकशाही विचाराचे समर्थन दोन्ही देशातील नागरिक स्वातंत्र्यापूर्वीपासूनच करीत होते. म्हणून दोन्ही देशाच्या परराष्ट्र धोरणात समानता दिसून येते.

### *उद्‌दिष्ट्यांमधील समानता :–*

भारत – अफगाणिस्तान संबंधांच्या उद्दिष्ट्यांमधील कांही अंशी प्रमाणात समानता आढळून येते. स्वातंत्र्यापूर्वी दोन्ही राष्ट्रांवर ब्रिटिशांचे वर्चस्व असल्यामुळे त्यांचे वर्चस्व झुगारुन स्वातंत्र्य मिळवून घेणे दोन्ही राष्ट्रांचे समान उद्दिष्टे होते. त्यासाठी दोन्ही राष्ट्रांना स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आंदोलने, युध्दे करावे लागले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दोन्ही राष्ट्रे युध्दात सामील न होता अलिप्त राहणे पसंद केले. शांततापूर्ण सहकार्य, मैत्री संबंध, सामूहिक विकास, हस्तक्षेपास विरोध, जागतिक शांततेस पाठींबा अशी दोन्ही राष्ट्रांची समान उद्दिष्टे दिसून येतात. या उद्दिष्ट्यांमुळेच दोन्ही राष्ट्रांतील संबंधाचा इतिहास सकारात्मक दिसून येतो.

### *भारत–अफगाणिस्तान संबंधातील महत्त्वाच्या घडामोडी :–*

स्वातंत्र्यापूर्वी दोन्ही राष्ट्रांचे संबंध समतोलाचे दिसतात. अफगाणिस्तानच्या स्वातंत्र्यानंतर १९२१ ते १९४७ हा अमानुल्लाचा कालखंड भारत–अफगाणिस्तान मैत्री पर्वाचा होता. अमानुल्ला याने स्वतंत्र अफगाणिस्तानची सूत्रे हाती घेतल्यानंतर ब्रिटिश सरकारला पत्रे लिहिले की, "भारताला स्वातंत्र्य मिळावे" नूर तराक्कीचा कालखंड भारत–अफगाणिस्तानच्या मैत्रीचा दिसतो. हाफिजुल्ला आमिन बबरक करमाल यांनी भारताच्या धोरणाचा स्वीकार करुन पाठींबा असल्याचे वेळोवेळी दर्शवित होते. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य प्राप्तीमुळे दोन्ही देशांच्या विचारात सकारात्मक बदल झाला. दोन्ही राष्ट्रे अलिप्ततेचा पुरस्कार केले, त्यामुळे अफगाणिस्तानमधील सोव्हिएत सैनिक माघार घेण्यासाठी श्रीमती इंदिरा गांधी यांनी प्रयत्न केला. त्यानंतर राजीव गांधी यांना प्रत्यक्ष यश आले. तेंव्हा अफगाण खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. काही कालखंडानंतर तालिबानी राजवट अफगाणिस्तानमध्ये निर्माण झाली. त्यावेळी अराजकता, हिंसक वातावरण निर्माण होवून स्थिर अफगाणिस्तानला अस्थिर अफगाणिस्तान बनविले. बुध्दाच्या भव्य–दिव्य मूर्त्यांची तोड–फोड क्रूर प्रवृत्तीच्या तालिबानी कार्यकर्त्यांनी केले. त्यामुळे भारत अस्वस्थ झाला, तीच तालिबान राजवट उध्दवस्त करण्यासाठी भारताने अफगाणिस्तानला सक्रिय पाठींबा दिला. त्यावेळी अमेरिकेचे सहकार्य अफगाणिस्तानला लाभले. १९९४ ते २००१ चा कालखंड तालिबान्यांचा होता. तालिबानी राजवट नेस्तनाबूत करण्यास अमेरिका–भारतास अखेर यश आले.

शेवटी अस्थिर अफगाणिस्तान स्थिर बनला. त्यावेळी हमीद करझाई सरकार स्थापन झाले. २००४ साली रितसर करझाई अफगाणिस्तानचे अध्यक्ष बनले. २००१ ते २००४ या कालखंडात भारत– अफगाणिस्तान दोन्ही देश कौटिल्याच्या विचाराचा स्वीकार

करुन मैत्री मजबूत केली. अखेर २००५ साली भारताने अफगाणिस्तानला सार्कचा आठवा सदस्य घोषित करुन युरोप खंडातील विकसित राष्ट्रे साम्यवादी चीन आणि समाजवादी राष्ट्रांना आश्चर्याचा धक्का देवून दक्षिण आशिया क्षेत्रात शांतता निर्माण करण्याचे व परस्पर सहकार्यातून विकास साधण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले. अफगाणिस्तान सार्कचा कायम सदस्यत्व स्वीकारल्या पासून भारत–अफगाणिस्तान संबंधांची मैत्री अधिकच मजबूत झाल्याचा जणू पुरावाच सार्क व्यासपीठावरुन दिसून येत आहे.

*सारांश :–*

भारत–अफगाणिस्तान संबंधांचा इतिहास हा सकारात्मक स्वरुपाचा दिसून येतो. अगदी प्रारंभिक काळापासून भारत–अफगाणिस्तान या राष्ट्रांना सारख्या प्रमाणात समस्यांचा सामना करावा लागला. त्यामुळे दोन्ही राष्ट्रांच्या विचारसरणीत भिन्नता कमी असून समानता अधिक दिसून येते. दोन्ही राष्ट्रांना पारतंत्र्य, वसाहतवाद, साम्राज्यवाद सतत होत असणाऱ्या हस्तक्षेपाचा त्रास दोन्ही राष्ट्रांना सारख्या प्रमाणात झालेला असल्यामुळे दोन्ही राष्ट्रे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर एका विचाराने अन्यायकारक वृत्तीला विरोध करणे पसंद करीत होते. दोन्ही राष्ट्रे पारतंत्र्यातून मूक्त होऊन स्वतःच्या राष्ट्राचा विकास करण्यासाठी विनाशकारी युध्दात सामील न होता तटस्थ राहण्याचे पसंद केले. त्याचबरोबर भारताने नवस्वतंत्र राष्ट्राचा गट निर्माण करुन विकसित राष्ट्रांना योग्य मार्गाने कार्य करण्यासाठी अलिप्त चळवळीचा एक मोठा गट निर्माण केला. त्या गटाच्या सरनाम्याचा स्वीकार विकसनशिल राष्ट्रे करुन चळवळ मजबूत केली. त्यात अफगाणिस्तानने हिरीरीने पुढाकार घेतला.

अर्थात भारतातील आणि अफगाणिस्तानातील नेत्यांमध्ये दुरावा अत्यल्प दिसून येतो. त्यामुळे दोन्ही राष्ट्रांचे ध्येय–धोरणे व विकासाचे तत्त्व समान दिसून येते. अफगाणिस्तानातील अमानुल्ला, जहीर शहा, युवराज शाह, शहजादे खतिम, मुहमद दाऊद, विदेश मंत्री वहीद अब्दुल्ला, वाणिज्य मंत्री महंमद खान, नूर महंमद तराक्की, हफिजुल्ला आमिन, बबरक करमाल, लोकशाही समर्थक हमीद करझाई आणि सध्याचे माहम्मद अशरपफ गनी या राजकीय पुढाऱ्यांच्या कारकिर्दीत राजकीय आणि आर्थिक संबंध मजबूत झाल्याचे दिसून येते. त्यासाठी भारत सदैव सकारात्मक भूमिका बजावत आला आहे. काही अंशी प्रमाणात भारत–अफगाणिस्तान संबंध पंतप्रधान देवेगौडा आणि नरसिंह राव यांच्या सरकारमध्ये दोन्ही राष्ट्रांचे संबंध तणावाचे होते. त्यावेळी अफगाणिस्तानमध्ये तालिबान्यांची राजवट होती (८–कृष्णानंद शुक्ल, भारत और एशियाई देश, पान १६०). असे असले तरी पाकिस्तानच्या तुलनेत भारत–अफगाणिस्तान संबंधाची मैत्री अधिकाधिक दिसून येते. याचे सर्व श्रेय नेहरु, श्रीमती इंदिरा गांधी, राजीव गांधी, इंद्रकुमार गुजराल, वाजपेयी आणि डॉ. मनमोहनसिंग यांना सर्वाधिक श्रेय दिले जाते.

२००५ साली अफगाणिस्तानला सार्कचे सदस्य देवून दोन्ही देशाच्या संबंधात गती देण्याचे काम हमीद करझाई आणि डॉ. मनमोहनसिंग यांनी केले. त्यांच्या काळात राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संबंध सहकार्याचे ठेवले. दोन्हीही देशात सार्वत्रिक निवडणूका झाल्या. त्यामुळे दोन्ही देशातील राजकीय सत्तेत बदल झाले. अफगाणिस्तानमध्ये ५ एप्रिल २०१४ रोजी पूर्वाध्यक्ष हमीद करझाई यांची जागा महंमद अशरफ गनी यांनी घेतले. त्यांना अफगाण नागरिकांनी सर्वाधिक पसंती देवून अध्यक्ष बनविले. त्याच प्रकारची निवडणूक भारतात २०१४ साली निवडणुक आयोगानी निवडणूका घेतली. चौदाव्या लोकसभेने सर्वाधिक पसंती नरेंद्र मोदी यांना देवून डॉ. मनमोहनसिंगांची जागा नरेंद्र मोदी यांनी घेतली.



त्यामुळे आजचे भारत–अफगाणिस्तान आर्थिक व राजकीय संबंधाचे भवितव्य भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अफगाणिस्तानचे राष्ट्राध्यक्ष महमंद अशरफ गनी यांच्या कार्यकुशलतेवर अवलंबून आहे. त्यांनी केलेल्या एका वर्षाच्या कामकाजानुसार असे दिसते की, किमान दोन्ही देशाचे संबंध आहे ते निश्चित ठेवतील किंवा त्यापेक्षा अधिक मजबूत करतील. हे त्यांच्या आजच्या आंतरराष्ट्रीय विचारधारेतील धोरणाच्या आधारावरुन अधिक स्पष्ट दिसून येते.

### *संदर्भ ग्रंथ*

१.इंद्रकुमार गुजराल, इतिहास के आईने में अफगाणिस्तान, दिनमान, १८ ऑगस्ट १९८४, पान ३८.
२.डॉ. जे. श्याम सुंदरम, विश्व राजनिती में भारत, रायपूर, १९८५, पान ४०.
३.दिनानाथ वर्मा, आधुनिक भारत, रायपूर, १९८३, पान १६७
४.वाई वोल्कोव, अफगाणिस्तान सच्चाई क्या है, दस्तावेज नवयुग पब्लिकेशन, नई दिल्ली, १९८०, पान ३८.
५.आतरचंद, इंडिया एण्ड अफगाणिस्तान सैंच्युरी, १९९७५, पान ०१.
६.डॉ. एन. के. श्रीवास्तव, भारत और विश्व राजनिती, साहित्यरत्न भवन, आग्रा, १९८५, पान १६६.
७.प्रदिपसिंह राव, अफगाणिस्तान समस्या, भारतीय विदेश निती के संदर्भ में, जयपूर, १९९६, पान २८.
८.कृष्णानंद शुक्ल, भारत और एशियाई देश, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, २००६, पान १६०.
९.आर. सी. अग्रवाल, भारत की विदेश नीती, किताब घर, ग्वॉलियर, १९८५.
१०.जवाहरलाल नेहरु, इंडियाज फॉरेन पॉलीसी, नई दिल्ली.
११.ओम नागपाल, विश्व राजनिती और भारत, गुप्ता, उज्जैन, १९८७.
१२.आर. रस्तोगी, इन्डो–अफगाण रिलेशन, नई दिल्ली, १९८१.
१३.सतीशकुमार, इयर बुक ऑन इण्डियाज फॉरेन पॉलीसी, सेज, नई दिल्ली, १९८५.
१४.डी राज हंस, अफगाणिस्तान नई राजनैतिक हवाओं का दौर, कादम्बिनी, जुलाई, १९७८.
१५.वैदिक व्ही. पी., इंडिया ॲण्ड अफगाणिस्तान, इंटरनॅशनल स्टडीज, दिल्ली, १९७८.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org